TARUN BHARAT

Tuesday, Feb 23, 2010.

# आयएमटी महाविद्यालय नागपूर विभागाचे विजेते

टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझ २०१० च्या प्रादेशिक फेरीत नागपूरच्या आय.एम.टी. महाविद्यालयाने नागपूर विभागाचे विजेतेपद पटकावले. व्ही.एन.आय.टी. महाविद्यालय दुसऱ्या क्रमांकावर राहिले. विजेत्या चमूत नेहा कटियाल व सौम्याजीत सामंताचा समावेश होता. यावर्षी ही स्पर्धा २० शहरांमध्ये घेण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे व्ही.एन.आय.टी. चे रजिस्ट्रार भास्कर गणवीर यांच्या हस्ते विजेत्यांना ७५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. उपविजेत्या व्ही.एन.आय.टी.च्या चमूला ३५ हजार रुपयाचे रोख पारितोषिक देण्यात आले.

याचवर्षी एप्रिलमध्ये मुंबई येथे स्पर्धेची अंतिम फेरी होणार असून, यात आय.एम.टी. नागपूरची विजेती चमू देशभरातील १९ प्रादेशिक विजेत्यांशी सामना करेल.